# ४. गायन

## ४.१ शास्त्रीय संगीत

### ख्याल

लोकप्रिय असलेला धृपद-धमार हा गीतप्रकार काळाच्या ओघात मागे पडला व त्याची जागा ख्याल गायनाने घेतली. ख्याल ही शृंगाररसपूर्ण, मधुर व शांत गायकी असल्यामुळे आजही ख्यालगायकी लोकप्रिय आहे. या गीतप्रकाराची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे घेता येईल.

### अर्थ व व्याख्या :

ख्याल हा पर्शियन शब्द आहे. पर्शियन भाषेत ख्यालाचा अर्थ विचार किंवा कल्पना असा होतो. स्वत:च्या प्रतिभेने मुक्तपणे स्वर, ताल आणि शब्द यांच्या माध्यमातून रागाचे नियम सांभाळून सादर केलेला गीतप्रकार म्हणजेच ख्याल असे ख्यालाबद्दल स्थूलमानाने म्हणता येईल.

### उगम :

तेराव्या शतकापर्यंत उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय संगीत असे भेद झालेले नव्हते. शारंगदेवांच्या काळातील साधारण गीती या प्रकारात ख्याल गायकीची बीजे सापडतात.

ख्याल हा स्वरप्रधान गीतप्रकार आहे. आलाप, ताना, बोलआलाप, बोलताना इत्यादी अलंकारीक बाबींनी ख्याल नटवला जातो.

### ख्यालाचा विषय :

ख्याल गायनाचा विषय ईशस्तुती, राजाची स्तुती, ऋतुवर्णन, शृंगाराच्या विविध छटा, बोधपर वचने इत्यादी असतात. ख्याल हा ब्रज, हिंदी, पंजाबी, मराठी व उर्दू भाषेत असतो. त्याची बंदिश संक्षिप्त असते. ख्यालाचे दोन प्रकार पडतात. (१) बडा ख्याल (२) छोटा ख्याल. बडा ख्याल विलंबित लयीत सादर केला जातो . त्यामुळे तो विलंबित एकताल, झुमरा, तिलवाडा व तीनताल इत्यादी तालांत गायला जातो तर छोटा ख्याल त्रिताल, मध्य व द्रुत एकताल, झपताल, आडा चौताल व रूपक अशा तालांत गायला जातो. ख्यालाच्या साथीसाठी तंबोरा, तबला, हार्मोनियम, सारंगी, स्वरमंडल ही वाद्ये वाजवली जातात.

### ख्याल गायक:

भारतीय अभिजात संगीतातील ख्याल गायकीला परमोच्च स्थानावर पोहोचवण्यासाठी अनेक कलावंतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यात उ. फैयाज खाँ. पं. भास्करबुवा बखले, पं. वि. दी. पलुस्कर, पं. मल्लिकार्जून मन्सूर, पं. सवाई गंधर्व, गंगूबाई हनगल, हिराबाई बडोदेकर, मालिनी राजूरकर, पं. भीमसेन जोशी, पं. जसराज, पं. अजय चक्रवर्ती, डॉ. प्रभा अत्रे, किशोरी आमोणकर, वीणा सहस्त्रबुद्धे, वसंतराव देशपांडे इत्यादी गायक/गायिकांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरेल.

## ४.२ उपशास्त्रीय संगीत

### ठुमरी :

उपशास्त्रीय संगीतातील एक शृंगाररसपूर्ण गीत प्रकार म्हणून ठुमरीचा उल्लेख करावा लागेल. ख्याल गायकीइतकाच लोकप्रिय असा हा गीत प्रकार आहे. पूर्वी ठुमरी शास्त्रीय संगीताच्या मंचावर दुय्यम प्रतीची मानली जात असे. आज मात्र संगीत मैफिलीत ठुमरीला मानाचे स्थान मिळाले आहे.

### ठुमरीची वैशिष्ट्ये :

१. ठुमरी ही प्रामुख्याने दोन शैलींमध्ये गायली जाते. अ) पूरब अंगाची ठुमरी ब) पंजाबी अंगाची ठुमरी
२. ठुमरी ही शब्दप्रधान, भावनाप्रधान व शृंगाररसप्रधान गायनशैली आहे.
३. हिंदी, ब्रज, उर्दू, पंजाबी या भाषेत ठुमरीची काव्यरचना केलेली असते.
४. स्थाई व अंतरा या दोन भागात ठुमरी गायली जाते.
५. शृंगाररसाच्या विविध छटा, कृष्णाच्या रासलीला, विरहिणीची विरहकथा इत्यादी काव्यविषय यामध्ये असतात.
६. काही ठरावीक रागांमध्ये ठुमरी गायली जाते. त्यामध्ये पिलू, पहाडी, खमाज, मांड, काफी, देस, तिलंग, झिंझोटी, भैरवी इत्यादी रागांचा समावेश असतो.

### ठुमरी गायनाची पद्‌धत :

ठुमरी गायनासाठी रागाचा आधार घेतलेला असला तरी राग नियमांचे काटेकोर पालन करण्याची आवश्यकता यात नसते. भावप्रदर्शन हा ठुमरी गायनाचा मुख्य हेतू असतो.

ठुमरी गायनात प्रथम स्थायी म्हटली जाते. त्यामध्ये बोलबनाव, बोलबांट या पद्‌धतीने ठुमरीला नटवले जाते. त्यानंतर अंतरा म्हटला जातो. गीताचे बोल वेगवेगळ्या पद्‌धतीने नटवून मुर्क्या, खटके, विविध हरकती व नजाकतीने ठुमरीची प्रस्तुती केली जाते. आलाप, तानांचा प्रयोग यात केला जात नाही. ठुमरी एक वैशिष्ट्यपूर्ण गायनशैली असल्यामुळे त्याची स्वतंत्र तालीम घेणे आवश्यक असते. ठुमरी गायनासाठी मधुर, चपळ व लवचीक अशा आवाजाची आवश्यकता असते. अंतऱ्याच्या शेवटच्या भागात पुन्हा स्थायी गाताना तबलावादक लग्गी, लडीचा उपयोग करतात त्यामुळे ठुमरी गायनाची रंगत वाढायला मोठी मदत होते. एकंदर लग्गीनंतर पुन्हा स्थाईची बंदीश गाऊन ठुमरी गायन संपवले जाते.

ठुमरी गायनाच्या साथीला तंबोरा, तबला, सारंगी, हार्मोनियम, व्हायोलिन अशी वाद्ये घेतली जातात.

### ठुमरी गायक :

ठुमरी गायकी प्रसिद्‌ध करण्यामध्ये अनेक कलावंतांचे योगदान आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ललनपिया, कदरपिया, बिंदादीन महाराज, बडे रामदास, सिद्‌धेश्वरी देवी, गिरीजादेवी, नैनादेवी, रसूलनबाई, बेगम अख्तर, शोभा गुर्टू, निर्मलादेवी, उ. बडे गुलाम अली, उ. बरकत अली, पं. जगदीशप्रसाद पंडीत या मागील पिढीतील गायकांबरोबरच आजच्या काळामध्ये उ. रशीद खाँ, पं.अजय चक्रवर्ती, डॉ. प्रभा अत्रे, पं. अजय पोहनकर, शुभा मुद्‌गल इत्यादी कलावंताचा उल्लेख करावा लागेल.

## ४.३ सुगम संगीत

### गझल :

भारतीय संगीतामध्ये रुजलेला व लोकप्रिय गीतप्रकार म्हणून गझलचा उल्लेख करावा लागेल. भारतावर अनेक आक्रमणे झाली. त्यामध्ये मुस्लीम शासकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. मुस्लीम शासकांच्या दरबारात अनेक कलावंत आश्रयाला राहात असत. त्या माध्यमातूनच ‘गझल’ हा गीत प्रकार भारतीय संगीतामध्ये समाविष्ट झाला.

### गझलची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

गझल हा प्राचीन गीत प्रकार असून अरबी काळात या गीतप्रकाराची निर्मिती झाली. गझल हा उर्दू भाषेतील गीतप्रकार आहे. प्राचीन इराणमधील हा प्रेमगीतांचा प्रकार सूफी संतांच्या माध्यमातून भारतात रुजला.

### गझलची वैशिष्ट्ये :

प्रेम, सौंदर्य वर्णन, ईश्वर व भक्ताचे नाते असे विविध काव्यविषय गझल या गीतप्रकारात असतात. भक्ती व शृंगाररसाचा मिलाप यात प्रकर्षाने आढळतो. यामध्ये शब्दांना विशेष महत्त्व दिले असल्यामुळे गझल हा शब्दप्रधान गीत प्रकार आहे. गझलमधील खास वैशिष्ट्य म्हणजे शेर होय. गझलचे अनेक चरण असून प्रत्येक दोन चरणांच्या खंडास ‘शेर’ असे म्हणतात. एका गझलमध्ये कमीतकमी पाच शेर असतात. शेरातील दोन सारख्या चरणांना मिळून ‘मिसरा’ म्हणतात. शेराच्या शेवटी येणाऱ्या सारख्या शब्दांना ‘रदीफ’ म्हणतात. रदीफच्या आधी येणाऱ्या व सारखे ध्वनी असणाऱ्या शब्दांना ‘काफिया’ म्हणतात. गझलच्या साथीसाठी हार्मोनियम, सारंगी, व्हायोलिन, संतूर, तबला इत्यादी वाद्ये वाजवली जातात.

### गझल गायनाची पद्‌धत :

गझल हा गीत प्रकार आकर्षक अशा चालीमध्ये गायला जातो. गझल गायनाचा विस्तार काव्यामधील अर्थाच्या अनुषंगाने करावा लागतो. आलाप आणि तानांचा मुक्त उपयोग यामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. दादरा, केरवा, रूपक इत्यादी तालांमध्ये गझल प्रामुख्याने गायली जाते.

फारसीतून मराठीत गझल आणण्याचे श्रेय माधव ज्युलियन यांना दिले जाते. यापूर्वी मणिकप्रभू आणि मोरोपंतांनीही हा काव्य प्रकार हाताळला होता. त्यानंतर प्रामुख्याने सुरेश भट हे नाव आदराने घेतले जाते.

### गझल गायक :

जगजीतसिंह, बेगम अख्तर, शोभा गुर्टू, मेहंदी हसन, हरिहरन, गुलाम अली, पंकज उधास, भीमराव पांचाळे.

## ४.४ लोकसंगीत

### पोवाडा :

महाराष्ट्रातील एक वीररसप्रधान लोकसंगीतातील गीतप्रकार म्हणजेच ‘पोवाडा’ होय. पोवाड्याला पवाडा



असेही म्हणतात. संस्कृत भाषेतील प्र + वद् = स्तुती करणे या धातूपासून पोवाडा शब्द निर्माण झाला आहे.

**उगम :**

दहाव्या शतकापासून विविध भाषांमध्ये स्तवनात्मक कवने रचली जात होती. त्यांना 'रासो' असे म्हणत असत. पोवाडा हेसुद्‌धा स्तवनात्मक काव्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील काही रोमहर्षक प्रसंग पद्यात वर्णन केले आहेत. तेही पोवाडा या प्रकारात जमा होतात.

**पोवड्याचे सादरीकरण :**

पोवाड्याची रचना लहान गद्यात्मक वाक्यांची आणि प्रवाही असते. त्याला पद्याची जोड दिलेली असते. पोवाड्याच्या बोलीभाषेत जिवंतपणा असतो. यातील चरण चार मात्रांच्या आवर्तनात गायले जातात. पोवाड्यातील परिच्छेदाला चौक ही संज्ञा असते. चरणाच्या शेवटी साथीदार जीऽ जीऽ ची जोड देत असतात. पोवाड्यातील घटनांत जिवंतपणा येण्यासाठी त्याचे केवळ निवेदन होत नाही तर त्याचे दर्शन घडवले जाते. श्रोत्यांना तो विषय समजावा यासाठी शाहीर त्यातील पात्रांच्या भूमिका साकारत असतो.

**वेशभूषा व वाद्ये :**

पोवाडा सादर करण्यासाठी शाहीर घेरदार बाराबंदी घालतो. खाली धोतर किंवा चुडीदार पायजमा परिधान करतो. डोक्यावर फेटा बांधलेला असतो. कमरेला शेला गुंडाळलेला असतो. गळ्यात कवड्यांच्या अथवा मोत्यांच्या माळा व कपाळावर कुंकवाची चंद्रकोर असते.

पोवाड्यात डफ हे प्रमुख वाद्य असते तसेच हार्मोनियम, ढोलकी, दिमडी, क्लॉरोनेट, ट्रॅंगल, झांज, घुंगरू, खंजिरी अशी वाद्ये साथीसाठी वापरली जातात. गायनाच्या साथीसाठी सहगायक/ गायिका असतात.

**शाहिरांचे योगदान :**

पेशव्यांच्या कारकिर्दीत शाहीर राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, पठ्ठे बापूराव, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे इत्यादी शाहिरांनी मोलाचे योगदान दिले.

शाहीर पिराजी सरनाईक, कृष्णराव साबळे, किसनराव हिंगे, विठ्ठल उमप, बाबासाहेब देशमुख, अमर शेख यांनी पोवाडा हा लोकसंगीत प्रकार महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचवला.

## स्वाध्याय

**प्र. १ विविध गायकांनी गायलेले विविध गीतप्रकार लक्षपूर्वक ऐका आणि त्याची वैशिष्ट्ये समजून घ्या.**

**प्र. २ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) ख्यालाच्या बंदिशीचे काव्य विषय कोणते?

(२) बडा ख्याल कोणकोणत्या तालांमध्ये गायला जातो?

(३) पोवाड्याच्या साथीसाठी कोणकोणती वाद्ये वापरतात?

(४) ठुमरी कोणकोणत्या रागांमध्ये गायली जाते?

**प्र. ३ खालील गीतप्रकारांची वैशिष्ट्ये लिहा.**

(१) ख्याल (३) गझल

(२) ठुमरी (४) पोवाडा

**उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने ख्याल गायक, ठुमरी गायक, गझल गायकांची, शाहिरांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्ध गायकांच्या, शाहिरांच्या मुलाखती/भेटी घ्या.**